# Post 3rd Convocation News 2023

# Article


## IIITN Youtube Link

**https://www.youtube.com/live/V3JdPVaihJE?feature=shared**



# ***PRESS INFORMATION BUREAU***

## https://pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=1969835


pib.gov.in/PressReleseDetailm.aspx?PRID=1969835

शिक्षण मंत्रालय

अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार - प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांचे ट्रिपल आयटीच्या तिसरा दीक्षांत समारंभाप्रसंगी प्रतिपादन

Posted On: 21 OCT 2023 8:14PM by PIB Mumbai

नागपूर, 21 ऑक्टोबर 2023

अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार असतात. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाजाला आधार देणार्‍या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार असतात. ते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात. अभियंते हे परिवर्तनाचे आधारस्तंभ असतात, असे प्रतिपादन नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम ( एनईटीएफ), नॅशनल बोर्ड ऑफ- एक्रीडेशन (एनबीए) या संस्थाचे अध्यक्ष प्रा अनिल सहस्रबुद्धे यांनी आज केले.



ाकरण केले.

णि इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजिनिअरिंग–ईसीईचे विद्यार्थी, इंफार्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजी-आा
ा कामगिरी केल्याबद्दल मानपत्र आणि रोख राशी प्रदान करण्याात आले.




ारंभाला विद्यार्थी त्यांचे पालक आणि इतर भागधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# LOCAL NEWS PAPERS

## 1. Lokmat

लोकमत

# अभियंते हे आधुनिक जगाचे शिल्पकार

## प्रा. अनिल सहस्रबुद्धे : ट्रिपल आयटीच्या ३२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : अभियंते हे आधुनिक जगाचे शिल्पकार असतात. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाजाला आधार देणाऱ्या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार असतात. ते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात. अभियंते हे परिवर्तनाचे आधारस्तंभ असतात, असे प्रतिपादन नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम, नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन (एनबीए) या संस्थांचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी येथे केले.

नागपूरच्या बुटीबोरीजवळ वारंगास्थित भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थान - ट्रिपल आयटीचा तिसरा दीक्षान्त समारंभ शनिवारी वारंगा कॅम्पस येथे पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी ट्रिपल आयटी नागपूरचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे, कुलसचिव कैलास डाखळे उपस्थित होते.

पदवीधर विद्यार्थी हे घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि या विश्वाच्या प्रगतीमागील प्रेरक शक्ती असतात. अत्याधुनिक तंत्रज्ञान उपाय आणि उद्योजकीय कौशल्यांच्या साहाय्याने समाजातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता तुमच्यामध्ये असून देशाच्या विकासात तुमचा हातभार लागेल, अशी विश्वासही प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केला.

संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. रिचा माखिजानींनी संचालन केले. कुलसचिव कैलास डाखळे यांनी आभार मानले.



दीक्षांत समारंभात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रा. अनिल सहस्रबुद्धे व ओ. जी. काकडे.

### अमन वर्मा व पवन कुमार यांचा विशेष सन्मान

दीक्षांत समारंभात एकूण ३२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यात पीएच.डी.चे ५ विद्यार्थी, १० एम.टेक.चे विद्यार्थी, १९७ संगणक विज्ञान अभियांत्रिकी-सीएसई आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर इंजिनिअरिंग-ईसीईचे विद्यार्थी, इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजी-आयसीटीमध्ये ११२ पदव्युत्तर पदविकेचे विद्यार्थी यांचा समावेश होता. यावेळी सीएसई अभ्यासक्रमाचे अमन वर्मा यांना आणि ईसीई अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पवन कुमार यांना उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी केल्याबद्दल मानपत्र आणि रोख राशी प्रदान करण्यात आली.

EXTRA DISCO

Hello Nagpur
Page No. 5 Oct 22, 2023
Powered by: erelego.com

## 2. Tarun Bharat

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-10-22 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार

## ● प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांचे प्रतिपादन ● ट्रिपल आयटीचा तिसरा दीक्षांत समारंभ




विद्यार्थ्यांना सन्मानित करताना अनिल सहस्रबुद्धे. सोबत डॉ. काकडे व कैलास डाखळे

◆ **नागपूर, २१ ऑक्टोबर**

अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार असतात. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाजाला आधार देणाऱ्या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार असतात. ते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात, असे प्रतिपादन नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरमचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले.

भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थानचा (ट्रिपल आयटी) तिसरा दीक्षांत समारंभ आज पार पडला. याप्रसंगी अनिल सहस्रबुद्धे, ट्रिपल आयटी नागपूरचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे, कुलसचिव कैलास डाखळे उपस्थित होते. पदवीधर विद्यार्थी हे घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि या विश्वाच्या प्रगतीमागील प्रेरक शक्ती असतात. अत्याधुनिक तंत्रज्ञान उपाय आणि उद्योजकीय कौशल्यांच्या सहाय्याने समाजातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता तुमच्यामध्ये असून देशाच्या विकासात तुमचा हातभार लागेल, अशी आशा याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहस्रबुद्धे यांनी व्यक्त केली. दीक्षांत समारंभाची सुरुवात शैक्षणिक मिरवणुकीने दीक्षांत सभागृहात झाली. संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले. या दीक्षांत समारंभात एकूण ३२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली गेली. आयसीटीमध्ये ११२ पदव्युत्तर पदविकेचे विद्यार्थी यांचा समावेश होता. सीएसई अभ्यासक्रमाचे अमन वर्मा यांना तर ईसीई अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पवन कुमार यांना मानपत्र आणि रोख राशी प्रदान करण्यात आली.

◀ *(तभा वृत्तसेवा)*



Powered by iDocuments

## 3. Hitavada

**TheHitavada** NAGPUR ■ Sunday ■ October 22 ■ 2023 CITYLINE

# Graduands should pursue excellence in whatever they do: Prof Sahasrabuddhe

■ In 3rd convocation of IIIT, Nagpur, Aman Verma from CSE was honoured for outstanding achievement while S Pavan Kumar stood topper from ECE

■ Staff Reporter

APPEALING graduands to pursue excellence in whatever they do, Prof Anil Sahasrabuddhe, Chairman, National Educational Technology Forum (NETF), Chairman of National Assessment and Accreditation Council (NAAC) and Chairman, National Board of Accreditation (NBA) said, "You engineers are the architects of our modern world, responsible for shaping the infrastructure, technology, and systems. Engineers are problem-solvers, innovators, and creators, and their contributions are felt in every corner of our lives. These are the only noteworthy skills that make you stand out professionally and personally."

Prof Sahasrabuddhe was addressing during the 3rd convocation of Indian Institute of Information Technology (IIIT), Nagpur at its premises at Waranga. Dr O G Kakde, Director of IIIT-Nagpur; Kailas N Dakhale, Registrar of IIIT-N and others were seated on the dais.

Prof Sahasrabudhe stated, "Engineers have a keen analytical ability that helps them approach challenges with a structured and logical mindset. With this strong analytical prowess the students can imagine new solutions to existing problems which lead them to the forefront of technological advancements. A perfect blend of creativity and practicality leads to ground-breaking inventions."

"The graduating students are the driving force behind the progress of our home, society, nation, world, mother earth and this universe! The country is proud to have you all as the pillars of transformation. May you all write the India's growth narrative," asserted Prof. Sahasrabudhe. He also mentioned that, he believes that everyone has the potential to address the challenges faced in the society with the help of cutting edge technology solutions and entrepreneurial skills.

Aman Verma of Computer Science Engineering (CSE) stood overall topper for securing the highest CGPA of 9.54 among the students of 2023 pass-out batch. He was also given the award for securing top position in his branch.

S. Pavan Kumar of Electronics and Communication Engineering (ECE) with CGPA- 9.21) topped his branch. Both students were honoured at the hands of Dr Sahasrabudhe.

Apart from individual awards, 212 Degrees were conferred onto the 5 PhD candidates, 10 MTech Information and Communication Technology (ICT) candidates, and 197 undergraduate students. Apart from this, 112 Post Graduate Diplomas were also conferred upon candidates.

Dr OG Kakde, gave the welcome address and presentation of the institute report. He also elaborated the achievements of the Institute and the developments done in the past seven years. Dr Richa Makhijani compered the programme. Kailas N. Dakhale, proposed a vote of thanks.

The convocation ceremony was attended by a large number of students – 4th pass-out batch, their parents, and other stakeholders from all over the country.



Aman Verma receiving a cash prize in recognition of his outstanding academic achievements at the hands of Prof Anil Sahasrabuddhe. Dr O G Kakde and Kailas Dakhale also are seen.



S Pavan Kumar of ECE (CGPA: 9.21) receiving first award of Merit at the hands of Prof Anil Sahasrabuddhe.

## 4. Mahasagar

# ट्रिपल आयटी नागपूरचा आज दीक्षांत समारंभ

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. २०:

बुटोबोरीजवळील वारंगास्थित भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थान म्हणजेच ट्रिपल आयटीचा तिसरा दीक्षांत समारंभ वारंगा कॅम्पस येथे आज शनिवारी २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या दीक्षांत समारंभाला नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम (एनईटीएफ), नॅशनल बोर्ड ऑफ- एक्रीडेशन (एनबीए) या संस्थाचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ट्रिपल आयटी नागपूर कॅम्पसमध्ये २०२३ च्या बॅचसाठी १६६ कंपन्यांनी भेट दिली आहे आणि २०२३ मध्ये उत्तीर्ण झालेल्या बॅचसाठी नोकरीचे वार्षिक पॅकिज ९० लाख रुपये आणि सरासरी वार्षिक पॅकिज १४ लाख रुपये इतके आहे.

या दीक्षांत समारंभाप्रसंगी एकूण ३२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. यात ५ पीएच.डीचे विद्यार्थी, १० एमटेकचे, १९ संगणक विज्ञान अभियांत्रिकी-सीएसई आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पुटर इंजिनिअरिंग-ईसीईचे विद्यार्थी, इंफार्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजीमध्ये ११२ पदव्युत्तर पदविकेचे विद्यार्थी यांचा समावेश आहे.

सीएसई अभ्यासक्रमाचे अमन वर्मा यांना तर ईसीई अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पवन कुमार यांना उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरीबद्दल मानपत्र आणि रोख रक्कम प्रदान केली जाणार आहे.

या संस्थेमध्ये-बी.टेक सीएसई (ह्यूमन कंप्यूटर इंटरेक्शन एंड गेमिंग टेक्नोलॉजी) बी; टेक सीएसई (डेटा साइंस एंड एनालिटिक्स) बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स एवं संचार इंजीनियरिंग) - बीटेक ईसीई (इंटरनेट ऑफ थिंग्स) या चार नव्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

सध्या ट्रिपल आयटी नागपूर कॅम्पसमध्ये विविध अभ्यासक्रमाचे २०२६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, अशी माहिती संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी दिली. दरम्यान, दिक्षांत समारोहाची सर्व तयारी पूर्ण झाली असून, देशभरातील अनेक मान्यवर तसेच विविध कंपन्यांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महासागर City Shopping

## 5. Daily Janprabhat

# अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार -प्रा.अनिल सहस्रबुद्धे यांचे ट्रिपल आयटीच्या तिसरा दीक्षांत समारंभाप्रसंगी प्रतिपादन

**नागपूर** ■ दिलीप येवले

अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार असतात. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाजाला आधार देणार्या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार असतात. ते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात. अभियंते हे परिवर्तनाचे आधारस्तंभ असतात, असे प्रतिपादन नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम ( एनईटीएफ), नॅशनल बोर्ड ऑफ-एक्रीडेशन (एनबीए) या संस्थाचे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्रबुद्धे यांनी आज केले.

नागपूरच्या बुटीबोरीजवळ वारंगास्थित भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्थान - ट्रिपल आयटीचा तिसरा



दीक्षांत समारंभ आज वारंगा कॅम्पस येथे पार पडला. कार्यक्रमाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी ट्रिपल आयटी नागपूरचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे, कुलसचिव कैलास डाखले यांची उपस्थिती होती.

पदवीधर विद्यार्थी हे घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि या विश्वाच्या प्रगतीमागील प्रेरक शक्ती असतात. अत्याधुनिक तंत्रज्ञान उपाय आणि उद्योजकीय कौशल्यांच्या सहाय्याने समाजातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता तुमच्यामध्ये असून देशाच्या विकासात तुमचा हातभार लागेल, अशी आशा प्रा. अनिल सहस्त्र बुद्धे यांनी व्यक्त केली.दीक्षांत समारंभाची सुरुवात शैक्षणिक मिरवणुकीने दीक्षांत समागृहात झाली.. संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले.

या दीक्षांत समारंभात एकूण ३२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली गेली. त्यात ५ पीएचडीचे विद्यार्थी, १० एमटेकचे विद्यार्थी,१९७ संगणक विज्ञान अभियांत्रिकी-सीएसई आणि इलेक्ट्रॉनिक्स कॉम्पुटर इंजिनिअरिंग-ईसीईचे विद्यार्थी, इंफार्मेशन कम्युनिकेशन टेक्नोलॉजी-आयसीटीमध्ये ११२ पदव्युत्तर पदविकेचे विद्यार्थी यांचा समावेश होता. ट्रिपल आयटीतर्फे सीएसई आणि ईसीई अभ्यासक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांनाही यावेळी पुरस्कार प्रदान करण्या त आले. सीएसई अभ्यासक्रमाचे अमन वर्मा यांना तर ईसीई अभ्यासक्रमाचे विद्यार्थी पवन कुमार यांना उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी केल्याबद्दल मानपत्र आणि रोख राशी प्रदान करण्यात आले.

समारंभाचे सूत्रसंचालन डॉ.रिचा माखिजानी यांनी केले तर डॉ.ओ.जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण केले. कुलसचिव कैलास डाखले यांनी आभार मानले. या दीक्षांत समारंभाला विद्यार्थी त्यांचे पालक आणि इतर भागधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 6.Maharashtra Times

# लिहा नव्या भारताच्या विकासाची कथा

■ प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांचे आवाहन; ट्रिपल आयटीचा तिसरा दीक्षांत समारंभ

**म. टा. प्रतिनिधी, नागपूर**

'अभियंत्यांकडे उच्च विश्लेषणात्मक क्षमता असते आणि तार्किक मनोवृत्तीने ते आव्हानांना सामोरे जातात. त्यांची सर्जनशीलता आणि व्यावहारिकता यांच्या मिश्रणातून अनेक नवे आविष्कार घडून येतात. नव्या दमाच्या अभियंत्यांनी आपल्या कामातून नव्या भारताच्या विकासाची कथा लिहावी', असे आवाहन नॅक आणि एनबीएचे अध्यक्ष डॉ. प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले.

इंडियन इन्स्टिट्युट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ शनिवारी साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे, कुलसचिव कैलास डाखले यांच्यासह विविध शाखांचे




ट्रिपल आयटीच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभात बोलताना नॅक आणि एनबीएचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे. व्यासपीठावर मान्यवर.

अधिष्ठाता, विभागप्रमुख उपस्थित होते.

'अभियंते हे आधुनिक जगाचे शिल्पकार आहेत. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाज घडविणाऱ्या प्रणालींची निर्मिती करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि विश्वाच्या प्रगतीचे काम पदवीधर विद्यार्थी घडवून आणू शकतात', असेही प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले.

समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. रिचा माखिजानी यांनी केले. संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले. आयआयआयटीएनचे कुलसचिव कैलास डाखले यांनी आभार मानले. सर्व पदवीधारक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

■ **तीनशेहून अधिकांना पदवी, पदविका**

या दीक्षांत समारंभात पाच पीएच.डी., दहा एम.टेक. आणि १९७ बी.टेक. अशा एकूण २१२ पदव्या प्रदान करण्यात आल्या. याशिवाय, ११२ पदव्युत्तर पदविकाही उमेदवारांना प्रदान करण्यात आल्या. अमन वर्मा आणि एस. पवन कुमार या विद्यार्थ्यांना सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल पुरस्कार देण्यात आले.

CS Scanned with CamScanner

# 7. Dainik Bhaskar

## तुम्ही अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार

**▸▸ प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांचे प्रतिपादन ▸▸ ट्रिपल आयटीचा तिसरा दीक्षांत समारंभ**




**नागपूर** ■ 'तुम्ही अभियंते आमच्या आधुनिक जगाचे शिल्पकार आहात, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि आमच्या समाजाला आधार देणाऱ्या प्रणालींना आकार देण्यासाठी जबाबदार आहात. अभियंते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात आणि त्यांचे योगदान आपल्या जीवनाच्या प्रत्येक कोपऱ्यात जाणवते. ही एकमेव उल्लेखनीय कौशल्ये आहेत, जी तुम्हाला व्यावसायिक आणि वैयक्तिकरित्या वेगळे बनवतात, असे प्रतिपादन राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच चे संस्थापक आणि अध्यक्ष प्रा. अनिल सहस्रबुद्धे यांनी येथे केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ शनिवार, २१ ऑक्टोबर रोजी संस्थेच्या आवारात आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसगी प्रा. सहस्रबुद्धे बोलत होते. याप्रसगी व्यासपीठावर संस्थेचे संचालक डॉ.ओ.जी. काकडे, रजिस्ट्रार कैलास एन. डाखले उपस्थित होते.

पुढे प्रा. सहस्रबुद्धे म्हणाले की, 'अभियंत्यांकडे तीव्र विश्लेषणात्मक क्षमता असते जी त्यांना संरचित आणि तार्किक मानसिकतेसह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करते. या मजबूत विश्लेषणात्मक पराक्रमाने विद्यार्थी विद्यमान समस्यांवर नवीन उपायांची कल्पना करू शकतात जे त्यांना तांत्रिक प्रगतीच्या आघाडीवर घेऊन जातात. सर्जनशीलता आणि व्यावहारिकतेचे परिपूर्ण मिश्रण ग्राउंडब्रेकिंग आविष्कारांना कारणीभूत ठरते.'

पदवीधर विद्यार्थी हे तुमचे घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि या विश्वाच्या प्रगतीमागील प्रेरक शक्ती आहेत. परिवर्तनाचे आधारस्तंभ म्हणून तुम्ही सर्व आहात याचा देशाला अभिमान आहे. तुम्ही सर्वांनी भारताच्या विकासाचे आख्यान लिहावे. असेही ते यावेळी म्हणाले.

समारंभाचे संचालन डॉ. रिचा माखिजानी यांनी केले. संस्थेचे संचालक डॉ. ओ.जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. ओ.जी. काकडे यांनी संस्थेच्या कामगिरीची आणि गेल्या सात वर्षांतील घडामोडींची माहिती दिली. कैलास एन. डाखले यांनी आभार मानले.

### दोन पुरस्काराचे वितरण

ट्रिपल आयटीने महत्वाच्या दोन पुरस्कारांचे वितरण केले. गुणवत्तेचा पहिला पुरस्कार दोन विषयांतील टॉपर्स सीएसईचे अमन वर्मा (सीजीपीए: ९.५४), आणि ईसीईचे एस. पवन कुमार (सीजीपीए: ९.२१) यांना प्रदान करण्यात आला. दुसरा पुरस्कार, सीएसईचे अमन वर्मा यांनी २०२३ च्या पास-आउट बॅचसाठी सर्वाधिक सीजीपीए मिळविल्याबद्दल हे पारितोषिक मिळवले. जो संस्थेचा सर्वोच्च पुरस्कार आहे.

### २१३ पदव्या प्रदान

तिसऱ्या दीक्षांत समारंभात, ५ पीएच.डी उमेदवार, १० एम.टेक इन्फॉर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी उमेदवार आणि १९७ अंडरग्रेजुएट विद्यार्थ्यांना २१२ पदव्या प्रदान करण्यात आल्या. याशिवाय ११२ पदव्युत्तर पदविकाही उमेदवारांना प्रदान करण्यात आल्या.

# 8. Lokshahi Warta



## अभियंते आजच्या आधुनिक जगाचे शिल्पकार

**प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांचे प्रतिपादन : ट्रिपल आयटी, नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ उत्साहात**

**लोकशाही वार्ता / नागपूर**

अभियंते हे आजच्या आधुनिक जगाचे शिल्पकार आहेत. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि समाजाला आधार देणाऱ्या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान उपाय आणि उद्योजकीय कौशल्यांच्या सहाय्याने समाजातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे, असे प्रतिपादन अध्यक्ष राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच आणि अध्यक्ष राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद व राष्ट्रीय मान्यता मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले.

ट्रिपल आयटी, नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ २१ ऑक्टोबर रोजी संस्थेच्या आवारात यशस्वीपणे पार पडला. यावेळी मुख्य अतिथी म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रा. सहस्त्रबुद्धे यांच्यासमवेत शैक्षणिक आघाडीतील इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.




प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे म्हणाले, अभियंते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्मातीत असतात. त्यांचे योगदान आपल्या जीवनाच्या प्रत्येक कोपऱ्यात जाणवते. त्यांच्या जवळील उल्लेखनीय कौशल्ये त्यांना व्यावसायिक आणि वैयक्तिकरित्या वेगळे बनवतात. अभियंत्यांकडे तीव्र विश्लेषणात्मक क्षमता असते. जी त्यांना संरचित आणि तार्किक मानसिकतेसह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करते. या मजबूत विश्लेषणात्मक पराक्रमाने विद्यार्थी विद्यमान समस्यांवर नवीन उपायांची कल्पना करू शकतात जे त्यांना तांत्रिक प्रगतीच्या आघाडीवर घेऊन जातात. सर्जनशीलता आणि व्यावहारिकतेचे परिपूर्ण मिश्रण ग्राउंडब्रेकिंग आविष्कारांना कारणीभूत ठरते. पदवीधर विद्यार्थी हे तुमचे घर, समाज, राष्ट्र, जग, मातृभूमी आणि या विश्वाच्या प्रगतीमागील प्रेरक शक्ती आहेत परिवर्तनाचे आधारस्तंभ म्हणून तुम्ही सर्व आहात याचा देशाला अभिमान आहे. तुम्ही सर्वांनी भारताच्या विकासाचे आख्यान लिहावे, असे आवाहन प्रा. सहस्त्रबुद्धे यांनी केले.

दीक्षांत समारंभाची सुरुवात भव्य शैक्षणिक मिरवणुकीने दीक्षांत सभागृहात झाली. समारंभाचे संचालन डॉ. रिचा माखिजानी यांनी केले. संस्थेचे संचालक डॉ. ओ. जी. काकडे यांनी स्वागतपर भाषण व संस्थेच्या अहवालाचे सादरीकरण केले. त्यांनी संस्थेच्या कामगिरीची आणि गेल्या सात वर्षातील घडामोडीची माहिती दिली. आयआयआयटीएनचे रजिस्ट्रार कैलास डाखले यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

तिसऱ्या दीक्षांत समारंभात ५ पीएच. डी. उमेदवार, १० एम. टेक इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी उमेदवार आणि १९७ अंडरग्रॅजुएट विद्यार्थ्यांना २१२ पदव्या प्रदान करण्यात आल्या. याशिवाय ११२ पदव्युत्तर पदविकाही उमेदवारांना प्रदान करण्यात आल्या. ट्रिपल आयटीने महत्त्वाच्या दोन पुरस्कारांचे वितरण केले. गुणवत्तेचा पहिला पुरस्कार दोन विषयांतील टॉपर्स सीएसईचे अमन वर्मा आणि ईसीईचे एस. पवन कुमार यांना प्रदान करण्यात आला.

## 9. Navbharat

**नवभारत**

### IIIT के दीक्षांत समारोह में नैक अध्यक्ष सहस्त्रबुद्धे ने कहा

# डिजिटलाइजेशन में देश को टॉप 10 में पहुंचायें



■ नागपुर, महानगर संवाददाता. नेशनल असेसमेंट एंड एक्रिडिटेशन काउंसिल (नैक) के अध्यक्ष प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे ने कहा कि आज के युवा इंजीनियर आधुनिक विश्व के शिल्पकार हैं. मूलभूत सुविधा, तकनीकी ज्ञान और समाज को आधार देने वाली प्रणाली को आकार देने की जिम्मेदारी है. अभियंता समस्या का समाधान करने, नवनिर्मिती करने और निर्माता होते हैं. उनका योगदान जीवन के प्रत्येक क्षेत्र में है. उन्होंने छात्रों से डिजिटलाइजेशन के क्षेत्र में भारत को विश्व स्तर पर पहले 10 राष्ट्रों में शामिल होने प्रयास करने का आह्वान किया.
वे आईआईआईटी के तीसरे दीक्षांत समारोह में बतौर अतिथि बोल रहे थे. उनके हाथों 5 पीएचडी, 10 एमटेक, 197 बीटेक और 112 स्नातकोत्तर डिप्लोमा प्रदान किये गये. डिग्री के अंतिम वर्ष में सर्वाधिक अंक हासिल करने वाले अमन वर्मा, एस.पवन कुमार को पुरस्कार प्रदान किये गये. प्रा. सहस्त्रबुद्धे ने कहा कि अभियंता के पास तीव्र विश्लेषणात्मक क्षमता होती है जो उन्हें संरचित और तार्किक मानसिकता सहित चुनौतियों का सामना करने में मदद करती है. मजबूत विश्लेषणात्मक पराक्रम से विद्यार्थी मौजूदा समस्याओं पर नये उपायों की संकल्पना को तैयार करते हैं. सभी मिलकर भारत के विकास का नया अध्याय लिखें. सभी में क्षमता है और चुनौतियों का सामना करने की ताकत भी है.समारोह में संचालक ओजी काकड़े ने संस्था की रिपोर्ट प्रस्तुत की. साथ ही 7 वर्षों की गतिविधियों की जानकारी दी. रजिस्ट्रार कैलास डाखले ने आभार माना. संचालन रिचा माखिजा ने किया.

Nagpur Edition
22-october-2023 Page No. 8
epaper.enavabharat.com

## 10. Loksatta

**लोकसत्ता**
लोकमान्य लोकशक्ती

# अभियंत्यांनो, देशाच्या विकासासाठी परिश्रम घ्या !

■ प्रा.सहस्रबुद्धे यांचे आवाहन ■ 'ट्रिपल आयटी'चा तिसरा दीक्षांत समारंभ

**लोकसत्ता प्रतिनिधी**




**नागपूर :** अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार आहेत. अभियंते अनेक समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात. त्यांचे योगदान आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर जाणवते. ते जगाच्या परिवर्तनाचा आधारस्तंभ असून देशाच्या विकासासाठी त्यांनी परिश्रम घ्यावे, असे आवाहन नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरमचे अध्यक्ष प्रा. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीद्वारे आयोजित तिसऱ्या दीक्षांत समारंभात ते अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ.ओ.जी. काकडे व सर्व शाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते. यावेळी प्रा. सहस्त्रबुद्धे म्हणाले, अभियंत्यांकडे तीव्र विश्लेषणात्मक क्षमता असते जी त्यांना संरचित आणि तार्किक मानसिकतेसह आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करते. या मजबूत विश्लेषणात्मक पराक्रमाने ते विद्यमान समस्यांवर नवीन उपायांची कल्पना करू शकतात. सर्जनशीलता आणि व्यावहारिकतेचे परिपूर्ण मिश्रण आविष्कारांना कारणीभूत ठरत असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमात ५ पीएच.डी.चे विद्यार्थी, १० एम.टेक.चे विद्यार्थी, १९७ बी.टेकचे विद्यार्थी, आयसीटीमध्ये ११२ पदव्युत्तर प्रमाणपत्राचे विद्यार्थी यांना पदवी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याशिवाय अमन वर्मा (सीजीपीए: ९.५४), एस. पवन कुमार (सीजीपीए: ९.२१) यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

संस्थेचे संचालक डॉ.ओ.जी. काकडे यांनी अहवाल सादर केला. संचालन डॉ.रिचा माखिजानी यांनी केले.

22/10/2023 | Nagpur | Page : 09
Source : https://epaper.loksatta.com

## Akashwani


9:38
आकाशवाणी बातम्या नागपूर @airnews_... · 16h
अभियंते आधुनिक जगाचे शिल्पकार असतात. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान व समाजाला आधार देणाऱ्या प्रणालींना आकार देण्यासाठी ते जबाबदार असतात. ते समस्या सोडवणारे, नवनिर्मिती करणारे आणि निर्माते असतात -राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच (NETF) चे संस्थापक आणि अध्यक्ष @adsahasrabudhe
#Nagpur
तृतीय
दीक्षांत समारोह
भारतीय सूचना प्रौद्योगिकी,
3rd
Convocation
Indian Institute of Information
1